# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:12.02.2026** **वार: गुरुवार**

1. रोजगार निर्मितीसाठी भव्य पायाभूत सुविधा आणि कामगार-केंद्रित क्षेत्रांवर केंद्राचा भर
2. महाराष्ट्रात सध्या दीड लाख कोटी रुपयांचे रेल्वे प्रकल्प प्रगतीपथावर
3. वंदेमातरम गीताच्या सादरीकरणाबाबत केंद्राद्वारे सुधारित निर्देश
4. मादागास्करमध्ये, गेजानी चक्रीवादळामुळे 31 जणांचा मृत्यू आणि
5. एफ आय एच हॉकी प्रो लीग मध्ये आज भारतीय संघाचा सामना अर्जेंटिनाबरोबर

**<u>सीतारामन</u>**

बंदरांशी थेट संपर्क नसलेल्या राज्यांमध्ये मालवाहतूक आणि वितरण व्यवस्थापनाचा खर्च कमी करण्यासाठी सरकार जलमार्गांवर लक्ष केंद्रित करत असल्याची माहिती अर्थमंत्री निर्मलासीतारामन यांनी काल लोकसभेत दिली. 2026-27 च्या केंद्रीय अर्थसंकल्पावर झालेल्या चर्चेला उत्तर देताना त्या बोलत होत्या. सरकार पायाभूत सुविधांमध्ये केवळ रस्ते आणि महामार्गांवरच नव्हे तर जलमार्गांवरही लक्ष केंद्रित करत असून समुद्री बंदरांशी थेट न जोडलेली राज्ये देखील कमी खर्चात एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी माल वाहतूक करू शकणार आहेत असं त्या म्हणाल्या.

सरकारचं लक्ष कामगार-केंद्रित क्षेत्रांवर आहे. तसंच प्रत्येक जिल्ह्यात पशुवैद्यकीय शल्यचिकित्सक, रुग्णालये आणि चाचणी प्रयोगशाळा यासारख्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी पशुसंवर्धन आणि मत्स्यपालनावरही आपण लक्ष केंद्रित करत आहोत.

याशिवाय यंदाच्या कर संकलनात राज्यांचा वाटा 25 लाख 44 हजार कोटी रुपयांचा असेल असंही सीतारामन यांनी सांगितलं.

राज्यात एक लाख 50 हजार कोटी रुपयांचे रेल्वे प्रकल्प सुरू असल्याची माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल लोकसभेत दिली. अहिल्यानगरचे खासदार निलेश लंके यांनी यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. नाशिकच्या कुंभमेळ्यासाठीही विविध उपाययोजना सुरू असल्याचं त्यांनी सांगितलं.

महाराष्ट्रात रेल्वे विकासाचं काम व्यापक पद्धतीनं सुरू असून यंदा 23 हजार 923 कोटी रुपये देण्यात आले आहेत. यूपीए सरकारच्या काळात ही रक्कम केवळ 1 हजार 100 कोटी रुपये होती. राज्यातल्या औद्योगिक शहरांना जोडण्यासाठी अनेक नवीन प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत असंही त्यांनी सांगितलं.

**<u>वॉका-वंदेमातरम</u>**

केंद्र सरकारनं वंदे मातरम गीताच्या सादरीकरणासाठी अधिकृत नियमावली स्थापित करण्याकरिता नवीन व्यापक मार्गदर्शक तत्त्वं काल जारी केली. सरकारी कार्यक्रमांमध्ये ते कसं आणि केव्हा सादर करावं आणि त्यावेळीउपस्थितांनी काय पालन करावं ते यात स्पष्ट केलं आहे. एक वृत्तांत, माझे सहकारी राजेंद्र लेले यांच्याकडून...

**या मार्गदर्शक तत्वांनुसार, सहा कडव्यांचा समावेश असलेलं आणि सुमारे 3 मिनिटे आणि 10 सेकंद कालावधीच्या वंदे मातरम या गीताची संपूर्ण अधिकृत आवृत्ती प्रमुख राज्य कार्यक्रमांच्या प्रसंगी सादर केली पाहिजे किंवा वाजवली पाहिजे. यामध्ये राष्ट्रध्वज आरोहण, राष्ट्रपती आणि राज्यपालांचं औपचारिक आगमन आणि प्रस्थान समारंभ आणि अशासारख्या समारंभांमध्ये-त्यांच्या नियोजित भाषणांपूर्वी आणि नंतर-अशा प्रसंगांचा समावेश आहे. वंदे मातरम आणि राष्ट्रगीत दोन्ही कार्यक्रमांचा भाग असतात, तेव्हा राष्ट्रगीतापूर्वी वंदेमातरम सादर केलं पाहिजे. या दोन्ही सादरीकरणावेळी उपस्थितांनी लक्षपूर्वक उभं राहणं अपेक्षित आहे.**

**गृह मंत्रालयानं शैक्षणिक संस्थांना दैनंदिन शालेय संमेलनांमध्ये आणि महत्त्वाच्या संस्थात्मक कार्यक्रमांमध्ये वंदे मातरम गायनाला प्रोत्साहन देण्याचं आवाहन केलं आहे. विद्यार्थी आणि सामान्य लोकांमध्ये या राष्ट्रीय प्रतीकांबद्दल जागरूकता आणि आदर निर्माण करण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आलं आहे.**

## मोदी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल रोल्स-रॉयसचे मुख्य कार्यकारी अधिकारी टुफान एर्गिनबिल्गिक यांची भेट घेतली. भारतात रोल्स-रॉयसच्या व्यवसाय वाढवण्याच्या आणि देशातल्या नाविन्यपूर्ण तसंच गतिमान युवा पिढीसमवेत भागीदारी करण्यासाठी असलेल्या त्यांच्या उत्साहाचं भारतात स्वागत आहे असं मोदी यांनी समाज माध्यमावरील एका संदेशात म्हटलं आहे.

## बंगला देश-मतदान

बांगला देशमध्ये आज सुरक्षिततेच्या कडेकोट बंदोबस्तात राष्ट्रीय संसदीय निवडणुकीसाठी मतदान होत आहे. या निवडणुकीत 299 मतदार संघांतल्या 42 हजार 779 केंद्रांवर मतदान होत आहे. दूरचित्रवाणीवर केलेल्या भाषणात, मुख्य निवडणूक आयुक्त ए एम एम नासिरुद्दीन यांनी नागरिकांना शांततेनं मतदान करण्याचं आणि निकाल स्वीकारण्याचं आवाहन केलं आहे. कोणत्याही अनुचित घटनेवर कडक कारवाई केली जाईल असा इशाराही त्यांनी दिला. सुमारे 9 लाख 58 हजार सुरक्षा कर्मचारी देशभर तैनात करण्यात आले आहेत.

## सीबीआय सायबर क्राइम

केंद्रिय अन्वेषण विभाग अर्थात सीबीआय आणि भारतीय सायबर गुन्हेगारी समन्वय केंद्रानं नवी दिल्लीत दोन दिवसांचं राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित केलं होतं. सायबर गुन्हेगारीद्वारा होणाऱ्या फसवणुकीच्या घटनांचा तपास तसंच गुन्हेगारांची सहायक यंत्रणा नष्ट करण्याच्या दृष्टीनं नियमांमध्ये सुधारणा, कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर आणि जागतिक सहकार्य या मुद्द्यांवर यावेळी चर्चा करण्यात आली. समाज माध्यमं, संदेशवाहक सेवा आणि डिजिटल मध्यस्थ यांची फसवणुकीच्या घटनांमधील भूमिका यावेळी तपासून पाहण्यात आली. सायबर गुन्हेगारीच्या यशस्वी तपासाच्या घटनांची माहिती देऊन तपास क्षमता आणि तपास यंत्रणांमधला समन्वय वाढवणाऱ्या कृत्रिम बुद्धीमत्ता आधारित साधनांचं प्रात्यक्षिकही दाखवण्यात आलं.

## इस्राइल-ट्रम्प

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि इस्राइलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्यात काल बैठक झाली. इराणसोबतची चर्चा पुढे सुरू राहिली पाहिजे या मुद्द्यावर आपण भर दिल्याचं ट्रम्प यांनी समाज

माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. इराणसोबत अणुकरार होण्याला प्राधान्य असल्याचं सांगून गेल्या वेळी इराणनं अणु कराराला नकार दिल्यानंतर केलेल्या हल्ल्याची त्यांनी आठवण करुन दिली.
दरम्यान, इराणचा बॅलिस्टीक क्षेपणास्त्र उपक्रम आणि हमास, हिज्बुल्लाह सारख्या दहशतवादी संघटनांना पाठिंबा यावरही चर्चा व्हायला हवी असं इस्त्राइलनं म्हटलं आहे.

**<u>कापड करार</u>**

भारत आणि अमेरीका यांच्यात झालेल्या अंतरिम व्यापार कराराचं वस्त्र उद्योगानं स्वागत केलं आहे. या करारामुळे भारत आणि अमेरिकेदरम्यानच्या व्यवसायात वाढ होणार असल्याचं अलोक इंडस्ट्रीज लिमिटेडचे संचालक आणि रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडचे अध्यक्ष, अनिल राजवंशी यांनी सांगितलं. तसंच कापड उद्योगातल्या साडे चार कोटींपेक्षा जास्त लोकांना त्याचा लाभ होणार असल्याचंही त्यांनी नमूद केलं. या करारामुळे रोजगार निर्मिती आणि उत्पादकतेतही वाढ होणार आहे.

**<u>केरळ-निवडणूक</u>**

केरळचे मुख्य निवडणूक अधिकारी रतन यू. केळकर यांनी काल मुनारमध्ये राज्यातली पहिली आदिवासी पंचायत, एडमालक्कुटीला भेट देऊन आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विशेष गहन सुधारणा (SIR) प्रगतीचा आढावा घेतला. आदिवासी भागातल्या SIR संबंधित कार्यवाही 14 फेब्रुवारीपर्यंत पूर्ण होऊन, 21 फेब्रुवारीला अंतिम मतदार यादी जाहीर होणार असल्याचं त्यांनी सांगितलं. राज्यातल्या 64 विधानसभा मतदार संघांमध्ये SIR सुनावणी प्रक्रिया आधीच पूर्ण झाली असल्याची माहिती केळकर यांनी दिली.

**<u>मादागास्कर चक्रीवादळ</u>**

मादागास्करमध्ये, गेजानी चक्रीवादळामुळे मृत्यू  झालेल्यांची संख्या 31 झाली आहे. या चक्रीवादळामुळे टोमासिना बंदर मोठ्या प्रमाणात प्रभावित झालं असून या ठिकाणी घरं कोसळली असून संपूर्ण शहराचा वीज पुरवठा बंद झाला आहे. मादागास्करच्या हवामान विभागानं  अनेक भागांसाठी लाल बावटा जारी केला असून ,संभाव्य पूर आणि भूस्खलनाचा इशारा दिला आहे. इमारती कोसळल्यामुळे अनेक लोकांचा मृत्यू झाला असून, किमान 36 लोक गंभीर जखमी झाले आहेत. चार जण बेपत्ता असून 6,000 हून अधिक लोक विस्थापित झाले आहेत.

**<u>कॅनडा गोळीबार</u>**

कॅनडातल्या ब्रिटिश कोलंबियामध्ये एका शाळेत झालेल्या गोळीबारात 8 जणांचा मृत्यू झाला असल्याचं वृत्त आहे.  यामध्ये गोळीबार करणाऱ्या महिलेचाही समावेश असण्याचा अंदाज असल्याची माहिती स्थानिक पोलिसांनी दिली. याशिवाय, या शाळेजवळच्या एका घरात 2 मृतदेह सापडले आहेत. या घटनेत 25 जण जखमी झाले आहेत.

**<u>पं.दीनदयाल उपाध्याय हिंस-नांदेड</u>**

भारतीय जनसंघाचे सहसंस्थापक, एकात्म मानववाद आणि अंत्योदय या विचारांचे प्रणेते पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या पुण्यतिथीनिमित्त 'समर्पण दिनी' काल त्यांना देशभरात आदरांजली वाहण्यात आली. भारतीय जनता पार्टी तर्फे मुंबई प्रदेश कार्यालयात तसंच नांदेड इथंही त्यांच्या प्रतिमेला आदरांजली अर्पण करण्यात आली.

**<u>क्रिकेट</u>**

वीस षटकांच्या सामन्यांच्या आयसीसी विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेत काल वेस्ट इंडीजच्या संघानं इंग्लंडच्या संघावर 30 धावांनी विजय मिळवला. ब गटातल्या सामन्यात ऑस्ट्रेलियानं आयर्लंडवर 67 धावांनी विजय मिळवला. तिसऱ्या सामन्यात वीस षटकांत दक्षिण अफ्रिका आणि अफगाणिस्तानची धावसंख्या समान झाल्यामुळे नियमानुसार सामन्याच्या निर्णयासाठी दोन अतिरिक्त षटकं खेळली गेली. यात दक्षिण अफ्रिकेनं 4 धावांनी विजय मिळवला.

**<u>FIH हॉकी प्रो लीग</u>**

एफ आय एच हॉकी प्रो लीग मध्ये काल राउरकेला मध्ये झालेल्या सामन्यात बेल्जियमनं भारताचा 1-3 अशा गोल्सनी पराभव केला.

हर्मनप्रीत सिंगच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाचा सामना आज अर्जेंटिनाशी होणार आहे. स्पर्धेच्या यजमान संघाचा सामना बेल्जियमशी येत्या 14 तारखेला होणार असून 15 फेब्रुवारीला अर्जेंटिनाविरुद्ध अंतिम सामना होईल.

**याबरोबरच, आकाशवाणी पुणे केंद्रावरचं राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार**